आज़ादी का अमृत महोत्सव

जिल्हा परिषद सोलापूर
जनसेवा हीच ईशसेवा

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

---

**दिव्यांग व्यक्तीसाठी तयार करण्यात आलेल्या दिव्यांग व्यक्ती हक्क 2016 ची अंमलबजावणी व त्या अनुषंगाने करावयाची कार्यवाही**

**जिल्हा परिषद,सोलापूर**
**सामान्य प्रशासन विभाग**
**जिपसो/साप्रवि-१/का-३/1377/२०२४ कार्यालय,दि.22/०८/२०२४**

**वाचा- ग्राम विकास विभाग,शासन निर्णय क्रमांक: अपंग-2019/प्र.क्र.714/आस्था-7 दिनांक** 07.09.2019

**//आदेश//**

ज्याअर्थी संदर्भीय शासन निर्णयान्वये दिव्यांग व्यक्ती हक्क् अधिनियम,2016 मधील कलम 23 अन्वये जिल्हा परिषद अंतर्गत तक्रार निवारण अधिकारी व अपिलीय अधिकारी घोषित करण्यात आले आहे.त्याअर्थी तालुकास्त्र व जिल्हास्तरावरील दिव्यांगांच्या तक्रारीचे निवारण करण्यासाठी समितीची रचना खालीलप्रमाणे करण्यात येत आहे.

**तालुका स्तर** :- प्रत्येक तालुक्यासाठी पंचायत समिती अंतर्गत कार्यरत असणा-या गट विकास अधिकारी यांना दिव्यांग व्यक्ती अधिनियम मध्ये कलम २३ अन्वये तक्रार निवारण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

ग्रामस्तरावर तसेच तालुका स्तरावर दिव्यांगाच्या तक्रारीचे निवारण करण्याचे काम संबंधित पंचायतीचे गट विकास अधिकारी यांनी करावयाचे आहे. त्यांच्याकडे दाखल केलेल्या तक्रारीवर त्यांनी ३० दिवसामध्ये आवश्यक ती कार्यवाही करावी. सदरच्या कार्यवाहीने तक्रारकर्त्यांचे समाधान न झाल्यास, संबंधिताकडून आदेश मिळण्यापासून ३० दिवसांच्या आत जिल्हास्तरावर गठीत करण्यात आलेल्या तक्रार निवारण समितीकडे ते अपिल अर्ज दाखल करू शकतील. तसेच, दिव्यांगाच्या प्राप्त होणा-या तक्रारीसाठी स्वतंत्रपणे पंचायत समिती स्तरावर (नोंदवही) ठेवण्यात यावी.

**जिल्हा स्तर** :- जिल्हास्तरावर तक्रार निवारण समिती गठीत करण्यात येत असुन, जिल्हा तक्रार निवारण समिती ही दिव्यांग व्यक्तींच्या जिल्हापातळी वरील तक्रारी तसेच तालुका पातळीवरील तक्रारी संबंधात अपिलिय प्राधिकारी म्हणून काम पाहील. तक्रार निवारण समितीची संरचना खालिल प्रमाणे राहील.

(१)मुख्य कार्यकारी अधिकारी - अध्यक्ष
(२) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी- सदस्य
(३) मुख्य लेखा व वित्त अधिकारी- सदस्य
(४) जिल्हा आरोग्य अधिकारी- सदस्य
(५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.वि.)- सदस्य सचिव

सदर समितीची बैठक दर महिन्याच्या १५ तारखेला घेण्यात येईल. ज्या महिन्या मध्ये १५ तारखेला कार्यालयीन सुट्टी असेल त्या महिन्यामध्ये सदरची बैठक पुढील लगतच्या कार्यालयीन दिवशी घेण्यात यावी. या बैठकीमध्ये जिल्हास्तरावर प्राप्त तक्रारी तसेच तालुका स्तरावरील अपील यांच्या कार्यवाहीबाबत निर्णय/आढावा घेण्यात येईल. सदर समितीकडे प्राप्त होणा-या तक्रारी अथवा अपीलाबाबत समितीने ४५ दिवसांत कार्यवाही करावी.सदरच्या आदेशाची प्रत जिल्हा परिषद,सोलापूरच्या संकेतस्थळावर पाहण्यास उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

जिल्हा परिषद सोलापूर
जनसेवा हीच ईशसेवा

**(मनिषा आव्हाळे)भाप्रसे**
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद,सोलापूर

**प्रतिलिपी – माहिती व कार्यवाहीसाठी अग्रेषित.**

1. अतिरिक्त् मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,सोलापूर
2. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि), जिल्हा परिषद,सोलापूर
3. सर्व विभाग प्रमुख -------------------------------- ,जिल्हा परिषद,सोलापूर
4. गट विकास अधिकारी,पंचायत समिती-------------------------------------
5. कार्यासन क्रमांक 15, 16-अ/ब/क,03,चौकशी कक्ष,साप्रवि